# भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना व भूमिका

**प्रस्तावना** - इ.स. १६०० साली इंग्लंडची राणी एलिझाबेथने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील राष्ट्रात व्यापार करण्याची सनद दिली. एका हातात तराजू व दुसऱ्या हातात तलवार घेऊन या कंपनीने १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत संपूर्ण भारत ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली आणला. १७५७ च्या प्लासीच्या युद्धाने भारतात ब्रिटिशांच्या सत्तेची मुहूर्तमेढ रोवली गेली. १७५७-१८५७ या १०० वर्षांत रॉबर्ट क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज, लॉर्ड डलहौसी वगैरे ब्रिटिश ग. ज. नी भारतात ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराचे काम पूर्ण केले. लॉर्ड डलहौसीने संस्थाने खालसा करण्याचे धोरण आखून सातारा, झाशी नागपूर, संबलपूर, औंध वगैरे संस्थाने खालसा केली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध भारतीयांच्या मनात जो राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व लष्करी असंतोष होता त्याची प्रतिक्रिया म्हणजे १८५७ चा उठाव होय. हा उठाव ब्रिटिशांनी मोडून काढला. हा उठाव अयशस्वी झाला असला तरी १८५८ साली इंग्लंडच्या राणीने एक जाहीरनामा काढून काही धोरणात्मक निर्णय घेतले. ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करून भारताचा कारभार ब्रिटिशांनी आपल्या हाती घेतला. हिंदी लोकांच्या धार्मिक व सामाजिक जीवनात हस्तक्षेप केला जाणार नाही; ख्रिश्चन धर्माची सक्ती केली जाणार नाही; साम्राज्यविस्तार केला जाणार नाही व पात्रतेनुसार नोकऱ्या देऊ असे जाहीरनाम्यात घोषित केले गेले.

ब्रिटिशांच्या वसाहतवादास प्रारंभापासूनच भारतीयांकडून विरोध होत होता. हा विरोध राजेरजवाडे, संस्थानिकांचा लष्करी प्रतिकार तर कधी सैनिक, आदिवासी, शेतकरी वर्गांच्या बंडाळ्याच्या रूपाने प्रकट झाला होता. परंतु हा विरोध असंघटित, स्थानिक स्वरूपाचा व राष्ट्रीयत्वाचा अभाव असलेला होता. १८५७ च्या उठावाने

Scanned with OKEN Scanner

प्र: राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे किंवा राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेचे कार्य कारणे सांगा? २.

1. अखंड भारताची निर्मिती
2. पाश्चात्य शिक्षण पद्धती
3. विविध धर्म सुधारणा कायदा
4. समाज सुधारकांचे प्रयत्न
5. वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण कामगिरी
6. आर्थिक शोषण करण्याचे इंग्रजांचे धोरण.
7. लॉर्ड लिटनची दडपशाही.
8. दळणवळणातील विकास
9. हिंदी (सुशिक्षितांवरील) अन्याय
10. युरोपियन राष्ट्रवाद पासून मिळालेली प्रेरणा.
11. भारतीयांना मिळालेली तुच्छतेची वागणूक
12. ब्रिटिशांचे साम्राज्यवादी धोरण
13. 1857 च्या उठावाची प्रेरणा
14. देशीभाषेचा विकास व राष्ट्रीय साहित्य निर्मिती.
15. उदारमतवादी प्रशासक व त्यांची प्रेरणा.
16. इलबर्ट बिला पासून मिळालेला धडा.
17. ब्रिटिशांचे वंश विद्वेषी धोरण
18. रेल्वे तारायंत्र, प्रेस, इ. वाहतूक.
19. हिंदी भाषेचा इंग्रजी भाषेचे सख्य.
20. सामाजिक अन्याय
21. पाश्चात्य संशोधकांचे कार्य.
22. युरोपीय राष्ट्रवादाची वाटचाल
23. उच्च नोकऱ्यांपासून भारतीयांना नकार.

१ भारतातील ब्रिटिश राजवट
२ इंग्रजी भाषा
३ राष्ट्रीय जागृती
४ भारतीय संस्कृती व परंपरांचा अ
५ आधुनिक दळण वळणाची साधने.
६ ख्रिश्चन मिशनरी
७ भारतीय प्रबोधन कारांचे कार्य
८ राजाराम मोहनरॉय व ब्राह्मोसमाज
९ प्रार्थना समाज " न्या. रानडे
१० स्वामी दयानंद सरस्वती व आर्य स
११ महात्मा फुले व सत्यशोधक समाज
१२ रामकृष्ण मिशन - स्वामी विवेकानंद
१३ लोक हितवादी - गोपाळ हरि देशमुख
१४ बाळशास्त्री जांभेकर जांभेकर
१५ पारशी समाज व सुधारक
१६ शिख धर्म सुधारणा
१७ सामाजिक सुधारणा सर सय्यद अ
१८ हिंदू संस्कृतीचा पाश्चात्यांनी केले
अ
१९ धर्म व समाज सुधारणेतून जागृती

* १८५७ ते १९४७ समाज सुधारणेचा अ

१ पाश्चिमात्य व पौर्वात्य समाज
२ स्त्री शिक्षण ② बाल विवाह
③ विधवा विवाह ① जाती भेद
१ अस्पृश्यता निवारण ⑥ शुद्धीकरण

संपत्तीचा आणि मानमसतबाचा त्याग करून लोकसेवेसाठी आणि लकजागृतीसाठी देशसेवेचे व्रत अंगीकारिले अशांच्या जीवनात या राष्ट्रवादाची वाढ हळूहळू झालेली आहे.''

अरविंदांचे हे मत पूर्णपणे बरोबर नाही. कारण भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीत ब्रिटिश राजवटीबद्दल निराशा, जुलूमशाही व काँग्रेसपूर्व अस्तित्वात असलेल्या विविध संघटनांनी केलेली जागृती यांचा सिंहाचा वाटा होता यात शंकाच नाही. राष्ट्रवादाच्या निर्मितीत इंग्रजी जाणणाऱ्या पहिल्या पिढीचे योगदान मोठेच होते.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी - .काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या विविध संघटना व त्यांचे कार्य :**

इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही अचानक उदयास आलेली संघटना नाही. तिच्या प्रत्यक्ष स्थापनेपूर्वी मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतात अनेक छोट्यामोठ्या संघटना कार्यरत होत्या. लोकमत जागृत करण्याचे काम त्या त्या संघटना करीत होत्या. या सर्व संघटनांचे नेते राष्ट्रभावनेने भारावलेले व पाश्चात्त्य विद्याविभूषित होते. या सर्व संघटनांच्या कार्याचा अंतिम परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय.

**१) ब्रिटिश इंडियन असोशिएशन (१८५१)** - १८३७ साली द्वारकानाथ टागोर यांनी लॅन्डहोल्डर्स असोशिएशन' ही संघटना स्थापन केली होती. जमीनदार वर्गाच्या हितसंबंधाची जोपासना करणे हा या संघटनेचा हेतू होता. पहिल्या दोन वर्षात तिने बरीच हालचाल केली होती, पण नंतर मागे पडत ६ वर्षात ती संपुष्टात आली. जॉर्ज थॉम्पसन या टागोर कुटुंबाशी निकटचा संबंध असलेल्या ब्रिटिश इसमाने लंडन येथे 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' ही संस्था १८३९ साली स्थापन केली होती. १८५१ साली या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करून 'ब्रिटिश इंडियन असोशिएशन' ही संस्था उदयास आली. या संस्थेद्वारा बंगाली तरुणांना सार्वजनिक कार्याचे शिक्षण देण्यात आले. या संस्थेचे एक सदस्य हरिश्चंद्र मुखर्जी यांना 'हिंदू पेट्रियट' या पत्रकातून ब्रिटिश सरकारवर कठोर टीका केली होती. या संस्थेच्या वतीने भारताच्या घटनात्मक व शासकीय धोरणाबाबत आपले निवेदन ब्रिटिश पार्लमेंटला पाठवले होते.

**२) मद्रास नेटिव्ह असोशिएशन (१८५२)** - ब्रिटिश इंडियन असोशिएशनच्या धर्तीवरच ही संस्था १८५२ साली मद्रास येथे स्थापन झाली. या संस्थेनेही कंपनी सरकारच्या गैरकारभारावर प्रकाश टाकणारे निवेदन पार्लमेंटला सादर केले होते. महसूल अधिकाऱ्यांकडून होणारे शेतकऱ्यांचे शोषण थांबवावे, शेतकऱ्यांवरील अवास्तव कर कमी व्हावेत अशी मागणी या संघटनेने केली. तसेच धरणे व कालवे बांधावीत,

Scanned with OKEN Scanner

शिक्षणप्रसार करावा व स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन कराव्यात अशीही मागणी केली होती.

**३) ईस्ट इंडिया असोशिएशन (१८६६)** - दादाभाई नौरोजी यांनी उमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सहकार्याने ही संघटना लंडन येथे ब्रिटिशांना भारतीय समस्यांची ओळख करून देण्याच्या हेतूने स्थापन करण्यात आली होती. विलियन वेडरबर्न या सेवानिवृत ब्रिटिश अधिकाऱ्याने या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले होते. भारताविषयी सहानुभूती असणारांना संघटनेची द्वारे खुली होती. या संस्थेच्या नियमीत बैठका होत, भारतीय प्रश्नांवर चर्चा होई व राजकीय सुधारणांच्या मागण्यांचे निवेदन ब्रिटिश पार्लमेंटला दिले जाई. या संघटनेच्या शाखा मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे स्थापन झाल्या होत्या. या संघटनेच्या व्यासपीठावरून अनेक उदारमतवादी इंग्रजांनी भारताविषयी ब्रिटिश लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**४) पूना असोशिएशन (१८६७) - पुणे सार्वजनिक सभा (१८७०)** - 'पूना असोशिएशन' हे प्रारंभी या संघटनेचे नाव होते. ते बदलून 'पुणे सार्वजनिक सभा' असे १८७० साली ठेवण्यात आले. गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) हे या संस्थेचे आधारस्तंभ होते. प्रारंभी काही राजेरजवाडे या संस्थेचे पदाधिकारी होते. या संस्थेने भारतीय समस्यांवर प्रकाश टाकणारी व्याख्याने आयोजित केली होती. या सभेच्या व्यासपीठावरून भारताच्या आर्थिक परिस्थितीबाबत रानडे यांनी दिलेली व्याख्याने फारच गाजली. न्या. रानडे हे या संस्थेचे अनेक वर्षे सूत्रचालक व प्रेरणाशक्ती होते. या संस्थेने शेतकऱ्यांच्या समस्या, सरकारचे आर्थिक धोरण यावर अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध केले होते. सार्वजनिक सभा ही लोकमान्य राजकीय संस्था बनली होती.

न्या. रानडे यांनी या सभेतर्फे सामाजिक व राजकीय जागृतीचे काम हाती घेतले. आर्थिक उन्नतीसाठी औद्योगीकरणाचा व स्वराज्याचा मंत्र या संस्थेने दिला. दुष्काळग्रस्तांना संघटनेने मदत केली. संस्थेने एक पाक्षिकही सुरू केले होते. स्वदेशी वस्तूंच्या वापराचा आग्रह संस्थेने धरला होता. पुढे १८९७ साली या संघटनेची परवानगी काढून घेतली गेली तरी राजकीय हक्कांची जाणीव व त्यासाठी सनदशीर मार्गाच्या आंदोलनाचे प्रशिक्षण देणारी संस्था म्हणून पुणे सार्वजनिक सभेचे कार्य महत्त्वाचे होते. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात संस्थेच्या शाखा होत्या.

**५) बॉंबे असोशिएशन** - कलकत्ता प्रांताच्या मानाने मुंबई प्रांत संघटना / संस्था स्थापन करण्यात मागे होता. १८४८ ला एलफिन्स्टन महाविद्यालयात Student literary and scientific Association स्थापन झाली. मुंबईकरांना सार्वजनिक जीवनात भाग घेण्याचे एक साधन प्राप्त झाले. १८५२ ला Bombay Association

Scanned with OKEN Scanner

स्थापन झाली. नाना शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी, नौरोजी वगैरेंचा या संस्थेत पुढाकार होता. नौरोजी म्हणत, ब्रिटिश राज्यात आमच्यावर जुलूम होत नसला तरी युरोपियन अधिकाऱ्यांना भारतातील परिस्थिती व परंपरा यांची माहिती नसल्याने त्यांनी काढलेल्या कायद्याने लोकांच्या भावना दु:खी होतात. म्हणून कायद्याचा मसुदा तयार झाल्यानंतर सूचना करण्याचे काम बाँबे असोशिएशनकडे द्यावे. पण ही सूचना विचारात घेतली गेली नाही.

**६) बाँबे प्रेसिडेन्सी असोशिएशन** - जानेवारी १८८५ मध्ये न्या. तेलंग, फिरोजशहा मेहता व तय्यबजी यांनी ही संस्था मुंबई शहरात बैठक घेऊन स्थापन केली. भारतीय प्रश्नांची चर्चा करून लोकमत जागृत करणे, जनतेच्या मागण्या निवेदन, अर्ज, विनंत्या याद्वारा सरकारला सादर करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट होते. दादाभाई नौरोजी यांचाही या संस्थेला आशीर्वाद होताच.

**७) मद्रास महाजन सभा (१८८४)** - मद्रास शहरात ही राजकीय संस्था १८८४ मध्ये स्थापन झाली. रंगय्या नायडू, सुब्बाराव पंतलू, सुब्रह्मण्यम अय्यर ही मंडळी या संस्थेची संस्थापक होती. १८८५ मध्ये या सभेने एक परिषद भरवून विधिमंडळास व्यापक रूप द्यावे, कार्यकारी व न्यायशाखेचे अधिकार वेगवेगळे असावेत अशी मागणी केली होती.

**८) इंडिया लीग (१८७५)** - 'अमृत बाझार' चे संपादक शिरिषकुमार घोष यांनी 'इंडिया लीग' ही संस्था स्थापन केली. राजकीय जागृती घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न या संघटनेने केला. पण 'इंडिया असोशिएशन' या संस्थेचा उदय झाल्याने 'इंडिया लीग' चे महत्त्व कमी झाले. 'इंग्लिशमन' या कलकत्त्यातील एका वृत्तपत्राने "भारतीय जनतेतील राजकीय जागृतीचा आविष्कार प्रथमच स्पष्ट करणारी संघटना" असा या संस्थेचा उल्लेख केला.

**९) इंडिया असोशिएशन (१८७६)** - काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी ज्या संघटना स्थापन झाल्या होत्या त्यात सर्वात महत्त्वाची ही संघटना आहे. सुरेंद्रनाथ बॅनर्जी तिचे संस्थापक होते. सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या संस्थेने केले. देशात प्रबळ लोकमत तयार करणे, समान राजकीय हितसंबंधाच्या भारतातील भिन्न जातींच्या व वंशांच्या लोकांचे ऐक्य घडवून आणणे, हिंदू-मुस्लिम यांच्यात ऐक्य घडवून आणणे ही या संस्थेची उद्दिष्टे होती. लॉर्ड लिटनने स्पर्धात्मक परीक्षेसाठीच्या वयाची मर्यादा २१ वरून १९ केल्याने मध्यमवर्गीय तरुण या संघटनेच्या व्यासपीठावर एकत्र आले. १८७९ मध्ये राजकीय जागृतीचे माध्यम म्हणून 'बंगाली' हे वृत्तपत्र प्रकाशित करण्यात आले. त्यातून ब्रिटिश सरकारवर टीका केली जाई. डिसेंबर

Scanned with OKEN Scanner